| पी.डब्ल्यू.डी.व्ही. अर्ज क्र. ५८/२०२५ मधील निशाणी क्र.१२ खालील आदेश (माधवी राहूल साळवी विरुध्द राहूल सुभाषराव साळवी व इतर) | MHAH150018472025 |
|---|---|

सदरचा अर्ज सामनेवाले यांनी त्यांच्याविरूध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" चा आदेश रद्द होवून म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाले याने शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाले यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, दिनांक १०.०२.२०२६ रोजी सामनेवाले यांच्याविरुध्द विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला आहे. सदर दिवशी सामनेवाला क्र. १ हा मा. न्यायालयात हजर होता. परंतु, म्हणणे टाईप करून दाखल करण्यास वेळ लागल्यामुळे त्याला प्रस्तुत अर्जात हजर होवून म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे त्याच्याविरूध्द विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला आहे. सदर अर्जामध्ये सामनेवाले यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. सामनेवाले यांचे म्हणणे रेकॉर्डवर न घेतल्यास त्यांचे फार मोठे नुकसान होणार आहे. सबब, सामनेवाले यांच्याविरूध्द झालेला "विनाम्हणणे" आदेश रद्द होवून त्याचे म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. अर्जदाराने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, सामनेवाले हे दिनांक २३.०९.२०२५ रोजी प्रस्तुत अर्जामध्ये हजर झाले आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत अर्जाची कल्पना आहे. सामनेवाले यांनी अर्जाचे कामकाज लांबवण्यासाठी जाणिवपुर्वक उशिर केला आहे. सामनेवाले यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केले नाही. सबब, जास्तीत जास्त दंड आकारूण अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. सामनेवाला हे दिनांक २३.०९.२०२५ रोजी अर्जात हजर झाले व त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केले

नाही. त्यास सामनेवाला यांनी सदर दिवशी म्हणणे टाईप करून दाखल करण्यास वेळ लागल्याने मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत सामनेवाला यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये पोटगी व इतर मागण्यांसाठी दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज पुर्णतः गुणदोषावर निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार सामनेवाले यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सामनेवाले यांच्याविरुध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. सामनेवाले यांनी अर्जदाराला दंडापोटी रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे फक्त) द्यावेत. तद्नंतर सामनेवाले यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.03.17 17:33:05 +0530

**(संध्या यु. सुळ)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण- नेवासा
दिनांक – १७/०३/२०२६